Impact Factor - 3.452

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2018

SPECIAL ISSUE-XXXVIII

## CHANGES IN TAX SYSTEM AND INDIAN ECONOMY




**Guest Editor :**
Dr. Ujjwala Deore
Principal,
Smt. Pushpatai Hiray Arts, Sci. & Comm.
Mahila Mahavidyalaya, Malegaon Camp, Dist. Nashik

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Dept. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik (MS) India.

**Executive Editor :** Mr. Mahadev Kshirsagar, Dr. Rajani Sawant & Dr. Meena Patil
Smt. Pushpatai Hiray Arts, Sci. & Comm. Mahila Mahavidyalaya,
Malegaon Camp, Dist. Nashik (MS) India.

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Indirect Taxation in India: Reforms for Economic Prosperity | Dr. Ritesh Kumar Singhal | 05 |
| 2 | Advantages and Disadvantages of GST in India | Dr. G. D. Kharat | 10 |
| 3 | Is GST A Bugbear for Indian Customers? | Ruby Gandhi | 15 |
| 4 | Impact of GST on Industries | Dr. Somnath Sanap | 19 |
| 5 | Role of GST in Modern Indian Economic Era | Dr. G. L. Shendge, Prof. G. T. Pawar | 22 |
| 6 | GST India Indirect Tax Reforms | Dr. Sunil Ghuge | 24 |
| 7 | Impact of Goods and Services Tax on Indian Economy - with reference to Agriculture sector | Mr. B. S. Pawar | 29 |
| 8 | GST- Structure, Impact and Future | Mr. D. P. Kamble | 34 |
| 9 | GST and Its Advantages and Disadvantages: A Study of Nashik City | Dr. Vijaykumar Wawle | 36 |
| 10 | GST Council : An Overview | Prof. Rizwana Hamdani | 43 |
| 11 | 'Goods and Services Tax (GST) – Its Impact on Consumers' | Prof. Vitthal Sadafule | 48 |
| 12 | Impact of Goods and Service Tax on Indian Industry | Dr. Ajaykumar Palwe | 52 |
| 13 | Problems of Indian Tax System | Dr. H. M. Kshirsagar, Dr. M. V. Jagtap | 56 |
| 14 | Goods and Service Tax (GST) and Indian Economy | Dr. N. C. Pawar | 62 |
| 15 | Revolution in the Tax System of India | Dr. D. R. Bachhav, Dr. Smt. Meena Patil | 66 |
| 16 | GST-Industry and Service Sector | Dr. Arti Lokhande | 71 |
| 17 | A Study on Impact of GST on Indian Economy | Dr. Vaijayanti Rathi | 76 |
| 18 | वस्तू व सेवा कराचे फायदे व त्यातील उणीवा | डॉ. नारायण गाढे | 81 |
| 19 | वस्तू व सेवा कराचे फायदे : एक दृटीक्षेप | प्रा. देवानंद मांडवधरे | 87 |
| 20 | जीएसटी आणि लघु व मध्यम उद्योग | डॉ. रजनी सावंत | 90 |
| 21 | जीएसटी आणि ग्राहक | डॉ. चंद्रकला शेवाळे | 93 |
| 22 | जीएसटी : भारतीय कर प्रणालीतील एक बदल | प्रा. एम. व्ही. हिरे | 96 |
| 23 | भारतीय कर प्रणाली | प्रा. अरुण शिंदे | 100 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# जी. एस. टी. : भारतीय कर प्रणालीतील एक बदल

**प्रा एम. व्ही. हिरे**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगाव कॅम्प
ता. मालेगाव जि. नाशिक
मोबाईल नं : ९४०३१९८४११ / ई - मेल : mvhiray@gmail.com

**प्रस्तावना :**

सार्वजनिक अर्थकारणाच्या सार्वजनिक खर्च व उत्पन्न या महत्वाच्या दोन बाबी आहेत. सार्वजनिक खर्च भागविण्यासाठी सरकारला विविध प्रकारच्या कर रुपाने उत्पन्न मिळवावे लागते. करांपासुन उत्पन्न मिळविणेही प्राचिन पध्दत आहे. सन १९४७ साली भारत स्वतंत्र झाला आणि प्राचीन व जून्या कर पध्दतीची चिकित्सा करुन करविषय नवीन कायदे समंत करण्यात आले. अलिकडे १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण स्विकारले . भारतातील कर पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी सन १९९२ मध्ये राजा चेल्लीया यांच्या अध्यक्षेतखाली कर सुधारणा समिती गठीत करण्यात आली. या सुधारणेनुसार भारतात सन १९९४-९५ पासुन सेवाकर बसविण्यात आला आणि कर प्रमुख १६ प्रकरच्या सेवांवर बसविण्यात आला त्यानंतर विजय ल. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली कर व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली या समितीने आपला अहवाल सन २००२ मध्ये सरकारला सादर केला या अहवालात त्यांनी भारतातील कर पध्दत गुंतागुंतीची असुन केंद्र सरकार , राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांना विविध प्रकारचे कर गोळा करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे कर प्रणालीत अनंत अडचणी आहेत. यावर उपाय म्हणुन सन २००५ साली शासनाने मुल्य वर्धीत कर प्रणाली लागु केली परंतु या पध्दतीत ही काही दोष दिसुन आलेत म्हणुन वस्तु व सेवा कराच्या अमंलबजावणी करीता संविधानात बदल करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार डॉ. बागची यांनी दुहेरी वस्तु व सेवा कर लागु करण्याचे सुचविले १ जुले २०१७ पासुन सेवा कराची अंमलबजावणी भारत सरकारने अंमलात आणली.

वस्तु व सेवा कर प्रणाली लागु करणारा भारत हा जगातील १६६ वा देश आहे. जगात सर्वांत प्रथम सन १९५८ मध्ये फ्रान्समध्ये जी.एस.टी कर प्रणाली लागु करण्यात आली त्यानंतर जगातील अनेक देशात ही कर प्रणाली लागु करण्यात आली आहे त्यामध्ये जपान, न्युझीलंड, कॅनडा, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, मलेशिया यासारख्या देशांचा समावेश आहे. प्रस्तुत शोधनिबंधात जी.एस.टी च्या अनुषंगाने भारतीय कर व्यवस्थेतील बदल अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :**

१) वस्तु व सेवा कर प्रणालीची संकल्पना अभ्यासणे
२) वस्तु व सेवा कर प्रणालीच्या गुणदोषांची चर्चा करणे
३) वस्तु व सेवा कर पध्दतीचा उणीवा दुर करण्याचे उपाय सुचविणे

**गृहितके :**

१) जी.एस.टी कर प्रणाली मुळे कर चुकवेगिरीचे प्रमाण कमी होईल.
२) जी.एस.टी करामुळे भारतात एक कर एक बाजारपेठ अशी प्रतिमा निर्माण होईल.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा द्वितीय तथ्य संकलनावर आधारीत असुन त्यामध्ये विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिक व दैनिक वर्तमानपत्रांचा पुरवण्यांचा आधार घेण्यात आला आहे.

**जी.एस.टी विषयक माहिती :**

भारतोन १ जुलै २०१७ पासुन देशात एक देश एक कर, एक बाजारपेठ या अनुषंगाने देशात जीएसटी कर लागु केला आणि आज ६ महिने पूर्ण झाले असुन विरोधीपक्ष व सत्ताधारी यांच्यात अजुनही आरोप-प्रत्यारोपाच्या फेरी सुरु आहेत. परंतु जीएसटी स्विकारणा-या देशांच्या अनुभवावरुन सुरुवातील काही महिने देशात महागाई होण्याची शक्यता वर्तविली जाते. परंतु कालांतराने ही स्थिती पूर्व पदावर येईल व काही वस्तुंच्या किंमती पूर्वीपेक्षा कमी होतील असा अंदाज वर्तविला जातो.

**जी.एस.टी कराचे टप्पे :** जीएसटी कौन्सिलने जाहिर केल्याप्रमाणे जी.एस.टी कराचे टप्पे ठरविण्यात आले.

**पहिल्या टप्प्यामध्ये :** गहु, तांदुळ, मांस, मासे अंडी दुध, भाज्या, फळे, मीठ, स्टॅंप पेपर छापील पुस्तके , वृत्तपत्रके, जैविक खत इत्यादी अत्यंत महत्वाच्या व सर्वसामान्यतर आवश्यक असणाऱ्या वस्तुंवर जीएसटी कर नाही.

**दुसऱ्या टप्प्यामध्ये :** पॅकबंद भाज्या, दुध पावडर, मसाले, मीठाई, तेल, ब्रेंडेड पनीर इ. वस्तुंवर ५ टक्के जी.एस.टी आकारण्यात येईल.

**तिसऱ्या टप्प्यात :** पॅक बंद मांस व त्यांचे पदार्थ, तुप, लोणी, सुका सॉस, चीझ, टुथपेस्ट व पावडर, ड्रॉईंग बुक, मोबाईल, भांडी, इलेक्ट्रीक वस्तु इत्यांदीवर १२ टक्के जी.एस.टी आकारण्यात येईल.

**चौथ्या टप्प्यामध्ये :** पास्ता, केक, पेस्टी, टिशू पेपर, हेल्मेट इ. वस्तुंवर १८ टक्के जी.एस.टी आकारण्यात येईल.

**पाचव्या टप्प्यामध्ये :** पानमसाला, व्हाईट चॉकलेट व चॉकलेट वेफर रंग, कार चे टायर, सुटकेस, डिओ, शेव्हींग क्रीम, स्टाईल, सिमेंट, वाटर हिटर एसी, व्हॅक्युक क्लिनर, मोटार सायकल, वॉलपेपर इ. वस्तुंवर २८ टक्के जी.एस.टी. आकारण्यात येणार आहे. जी.एस.टी कर प्रणाली लागु केली असतांनाच कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन इ. वर मात्र पूर्वी प्रमाणेच व्यवसाय कर, विक्रीकर या सारखे अप्रत्यक्ष कर आकाराले जाणार आहेत.

शासनाने वस्तु व सेवा कर प्रणाली लागु करतांना नफेतोटे विरोधी कायद्याची तरतुद केली आहे. जे विक्रेते करांची रक्कम वस्तुंच्या किंमतीतुन कमी करुन तसे लाभ ग्राहकांना देणार नाहीत आशा विक्रेत्यांवर कारवाई केली जाईल. वस्तु व सेवा कर प्रणालीनुसार नेहमी वापरात असणाऱ्या वस्तुंवर कराचे दर कमी असणार आहेत व ज्या वस्तु जास्त वापरात नसतील अशा वस्तु व सेवांवर जास्त कर आकारले जाणार आहेत. जी.एस.टी व व्यापाराधिष्ठीत कर असुन हा कर आकारला जाणार नसुन ज्या राज्यात वस्तु व सेवा विकल्या जाणार आहेत त्या राज्यांना हा कर मिळणार आहे. त्यामुळेच प्रादेशिक विकासाला चालना मिळेल.

**जी.एस.टी चे गुण/ फायदा :**

**१) सर्वसामान्य माणसाला फायदेशीर :**

जी.एस.टी हा ग्राहक केंद्रीत कर असल्यामुळे त्याचा ग्राहकांना जास्त फायदा होईल कारण सरकारने सर्वसामान्य माणसाच्या अनेक वस्तु या करातुन वगळल्या जात आहे. व जीवनावश्यक वस्तुंरील जी.एस.टीचा दर फक्त ५ टक्के ठेवला आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तुंची किंमती कमी होतील. पूर्वीच्या करपध्दतीत एकाच वस्तुंवर राज्यांचा कर, केंद्र सरकारचा कर, स्थानिक स्वराज्य संस्थांचा कर अशा अनेक करांचा समावेश होता. तसेच अप्रत्यक्ष कर किंमतीत समाविष्ट असल्यामुळे ग्राहकांना त्यांची जाणीव होत नव्हती फक्त किंमतीवाढ झाली

ISSN : 2348-7143
February 2018

एवढेच स्पष्ट होत असे. जी.एस.टी. मुळे सर्व वस्तुंचे दर समान असतील त्यामुळे स्वस्त वस्तु खरेदी करण्यासाठी दुसऱ्या राज्यात जावे लागणार नाही.

**२) उद्योग व्यव.ायासाठी लाभदायक :**

व तु व सेवांवर एकाच प्रकारचा कर आकारला जात असल्याने वस्तुंचा उत्पादन खर्च कमी होईल. तसेच कर नोंद-ी, कराचा भार विवरण पत्र दाखल करणे व कराचा परतावा याबाबी अधिक सोयीस्कर आहेत. तसेच उद्योगांची स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी करांचे अधिक कार्यक्षम सुलभीकरण केले आहेत. यामुळे पुरवठादारांचा फायदा होणार आहे.

**३) अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण :**

एक देश एक बाजार पेठ एक कर असे स्वरुप असणाऱ्या जी.एस.टी हा देशाच्या अर्थव्यवस्थेस सक्षम बनविणारा आहे. त्यामुळे संपुर्ण देश पातळीवर एकात्मीक सामाजिक, राष्ट्रीय, बाजाराची निर्मिती होण्यास मदत होईल. तसेच भारत एक महात्पादक केंद्र म्हणुन उदयास येणार आहे. जी.एस.टी मुळे गुंतवणुक वाढुन रोजगार निर्माण होण्यास मदत होईल. यासर्वांचा परिणाम अर्थव्यवस्थेची मजबुती वाढेल.

**४) सोपी व सुटसुटीत कर रचना :**

जी.एस.टी कर प्रणालीमुळे पुर्वीचे विविध कर प्रणाली रद्द होवुन एकच कर आकारण्यात येईल. त्यामुळे ही कर रचना साधी सोपी व सरळ वाटते. तसेच ही कर प्रणालीचा आणि कराचा दर सर्वत्र सारखा राहतो. त्यामुळे कर पध्दतीत सुसंगती दिसुन येते.

**५) महागाई नियंत्रण :**

जी.एस.टी मूळे वस्तुंच्या किंमती कमी होण्यास मदत होणार आहे. या पध्दतीमुळे पुर्वीच्या विविध कराचे एकत्रिकरण होणार आहे. पुर्वी जवळजवळ १८ पध्दतीचे कर होते. व त्यांचे प्रमाण ३०-३५ टक्के इतके होते. जी.एस.टी मुळे हे प्रमाण १८ च्या खाली येणार आहे. काही वस्तु या कर प्रणालीतुन वगळण्यात आल्या आहेत. त्यामुळे या कर प्रणालीतुन महागाई नियंत्रीत होण्यास मदत होईल.

**वस्तु व सेवा कर प्रणालीच्या उणीवा :**

**१) राज्याचे कर उत्पन्न बुडण्याची भिती :**

या कर प्रणालीमुळे अनेक राज्यांना कर उत्पनावर पाणी सोडावे लागेल. कारण देशात अग्रेसर असणाऱ्या राज्यांमध्ये उदा. महाराष्ट्रासारख्या राज्याला पहिल्याच वर्षी १४००० कोटी रु. च्या उत्पनाला मुकावे लागेल असे स्वतः मुख्यमंत्रीच म्हणाले आहेत. तेव्हा राज्य सरकारांना आपल्या जमा खर्चाचा मेळ घालतांना मोठी कसरत करावी लागणार आहे. परंतु केंद्र सरकारने पहिल्या ३ वर्षापर्यंत राज्यांना नूकसान भरपाई दिली जाईल अशी तरतुद केली आहे.

**२) महत्त्वाची उत्पादने जी.एस.टी. च्या कक्षेबाहेर :**

देशातील विविध वस्तुंवरील जी.एस.टी दर हे ५% , १२ % , १८% , व २८% असे करण्यात आले आहे. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे पेट्रोकेमिकल उत्पादने व मद्य हे जी.एस.टी च्या कक्षेबाहेर ठेवण्यात आल्याने जी.एस.टीत मोठी अपुर्णता आहे.

**३) महागाई वाढण्याची शक्यता :**

जगातील इतर देशांचा विचार करता जपान, मलेशिया, ऑस्ट्रोलिया, कॅनडा इ. देशात जी.एस.टी सुरु केल्यानंतर सुरुवातीला वर्ष दोन वर्ष महागाई वाढलेली दिसुन आली. भारतात मुळातच महागाई वाढलेली आहे. त्यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 38 : Changes in Tax System & Indian Economy
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

**४) क्लिष्ट कर रचना :**

वस्तु व सेवा कर प्रणालीत वस्तुंच्या विविध श्रेण्या दिलेल्या आहे. त्यांच्या व्याख्या, कर विवरण, भरण्याचा अल्प कालावधी या मुळे हा कर क्लिष्ट वाटतो.

**जी.एस.टी कर रचनेतील उणिवा दुर करण्याचे उपाय :**

१) पेट्रोलियम पदार्थ व मद्य यासारख्या वस्तुंवर जी.एस.टी. कर आकारुन महसुलात वाढ घडवून आणणे व एक मोठा उपभोगाचा भाग जी.एस.टी च्या कक्षेत आणणे आवश्यक आहे.

२) राज्यांच्या उत्पनाची भरपाई ही त्या प्रमाणात आणि दीर्घ काळ करणे आवश्यक आहे.

३) वस्तु व सेवा कर विषयक मार्गदर्शन करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी स्वतंत्र केंद्राची स्थापना करणे

**सारंश :**

भारत सरकारने ३० जुनच्या मध्यरात्रीपासुन वस्तु व सेवा कर (जी.एस.टी ) पध्दती सुरु केली. भारताच्या कर रचनेच्या ईतिहासातील हा फार मोठा बदल आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात देशाला आणखी एका कर सुधारणा कार्यक्रमाने प्रगतीच्या शिखरावर विराजमान केले आहे. वस्तु व सेवा कर प्रणालीने एक देश एक कर लागु झाल्याने एक संघ राष्ट्र निर्मितीस मदत होणार आहे. परंतु त्यामध्ये अडचणी सोडविण्यास व लोकांना पूर्ण ज्ञात होण्यास आणखी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

**संदर्भ :**

१. दैनिक लोकसत्ता :- लोकरंग मधिल लेख २४ जूलै २०१७.
२. दैनिक तरुण भारत :- मधील लेख २३ जानेवारी.
३. दैनिक सकाळ :- अर्थवेळ मधील लेख २३ जानेवारी २०१७.
४. भारतीय अर्थव्यवस्था :- श्रीधर देशपांडे .
५. www.govt of India finance ministry.com